पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-१, पुणे शहर
फरासखाना पोलीस स्टेशन बिल्डींग, ३ रा मजला, बुधवार पेठ, पुणे ०२
दुरध्वनी क्र. ०२०-२४४५४४५०
ईमेलः-dcpzone1.pune@nic.in

जा.क्र. पोउआ/परि-१/गणेशोत्सव/६६६०/२०१७ पुणे, दिनांक- ०३/०९/२०१७

# प्रेस नोट

## परिमंडळ-१ हद्दीमधील मुख्य गणपती विसर्जन मिरवणुकांचे नियोजन खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

**लक्ष्मी रोडवरील विसर्जन मिरवणुकः-**

- सदर मार्गावरील मिरवणुक दिनांक ०५/०९/२०१७ रोजी सकाळी १०.३० वा. टिळक पुतळा मंडई येथुन सुरु होईल. सदर मिरवणुकीमध्ये सुमारे २०० गणेश मंडळे सहभागी होणार आहेत.
- सदर मिरवणुकीत मानाचे पहिले ५ गणपती टिळक पुतळ्यापासुन कै.तात्यासाहेब गोडसे मार्गावरुन बेलबाग चौकात येतील व लक्ष्मी रोडने पुढे जातील.
- मानाच्या पहिल्या ५ गणपतींना त्यांचे मिरवणुकीत ३ पथके सामील करण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यासाठी त्यांचे सोबत दिनांक ०२/९/२०१७ रोजी बैठक घेण्यात आली असुन मानांच्या गणपतीच्या मिरवणुकीमध्ये खालील पथकांचा समावेश राहणार आहे.

| अ.नं. | मंडळाचे नाव | सामील करण्यात येणारे ढोल पथके |
|---|---|---|
| १ | कसबा गणपती मंडळ | १) रमणबाग पथक २) प्रभात बॅण्ड |
| २ | तांबडी जोगेश्वरी मंडळ | १) शिवमुद्रा पथक २) तालचक्र पथक ३) शौर्य पथक |
| ३ | गुरुजी तालीम मंडळ | १) शिवगर्जना पथक २) नादब्रम्हा पथक ३) चेतक स्पोर्टस् क्लब |
| ४ | तुळशीबाग मंडळ | १) स्वरुपवर्धीनी पथक २) हिंद तरुण मंडळ पथक ३) गजलक्ष्मी पथक |
| ५ | केसरीवाडा ट्रस्ट मंडळ | १) समर्थ पथक २) श्रीराम पथक ३) शिवमुद्रा पथक |

मानाच्या गणपती मिरवणुकीमध्ये वरील पथकांव्यतिरीक्त इतर कोणत्याही पथकास सामील होता येणार नाही.

- सिटी पोस्ट ऑफिस जवळ लागलेल्या रांगेतील बिगर रोषणाई गणपती मंडळांना बेलबाग चौकातुन लक्ष्मी रस्त्याने पुढे जाता येईल.
- रात्रौ. ०७.०० वा नंतर रोषणाईचे गणपती मंडळे शिवाजी रस्त्यावरुन बेलबाग चौक मार्गे लक्ष्मी रस्त्याने आळी-पाळीने पुढे जातील.

- जिलब्या मारुती मंडळ, हुतात्मा बाबुगेणु मंडळ, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी मंडळ, अखिल मंडई मंडळ व श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती ट्रस्ट हे ५ गणपती दिनांक ०५/०९/२०१७ रोजी २०.०० ते २१.३० वा. दरम्यान बेलबाग चौकमार्गे लक्ष्मी रोडवर येतील. यागणेश मंडळांना त्यांचे विसर्जन मिरवणुकीत प्रत्येकी ३ पथके सामील करण्याची परवानगी देण्यात आली आहे. या गणपतींच्या विसर्जन मिरवणुकीत खालील प्रमाणे पथके सहभागी होतील.

| अ.नं. | मंडळाचे नाव | सामील करण्यात येणारे ढोल पथके |
|---|---|---|
| १ | जिलब्या मारुती मंडळ | १) समर्थ पथक २) शिवमुद्रा पथक |
| २ | हुतात्मा बाबुगणु मंडळ | १) रुद्र गर्जना पथक २) शिवतेज पथक<br>३) गज वाद्य पथक |
| ३ | श्रीमंत भाऊ रंगारी मंडळ | १) श्रीराम पथक २) नादब्रम्हा पथक<br>३) आवर्तन पथक |
| ४ | अखील मंडई गणपती मंडळ | १)शिवगर्जना पथक २) न्यु.म.वि वाद्य पथक<br>३) गंधर्व बॅण्ड |
| ५ | श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती मंडळ | १) स्वरुपवर्धीनी पथक २) प्रभात बँण्ड<br>३) दरबार बँण्ड |

वरील पथका व्यतिरीक्त इतर कोणत्याही पथकास वरील गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीत सामील होता येणार नाही.

- लक्ष्मीरोड व शिवाजी रोडवर रांगा लावलेल्या गणेश मंडळांना ५-५ च्या संख्येने आळी-पाळीने लक्ष्मी रस्त्यावरुन पुढे जाता येईल.
- लक्ष्मी रोडवरील सेवासदन चौक- उंब-या गणपती चौक व अलका टॉकीज चौक या प्रमुख ३ चौकांमध्ये गणेश मंडळांना जास्तित-जास्त १० मिनीटे थांबुन बँण्ड पथकांचे किंवा ढोल पथकांचे वादन करता येईल. इतर चौकामध्ये मंडळांनी थांबु नये व आपली मिरवणुक सतत चालत पुढे घेऊन जावी.
- ढोल ताशा पथकांना बेलबाग चौक, सेवासदन चौक व चित्रशाळा चौक या तीन चौकांमध्येच चेंज ओवर करता येईल. लक्ष्मी रोडने कोणतेही ढोल ताशा पथक विरुध्द दिशेने बेलबाग चौकाकडे येणार नाही. सदरची पथके सेवासदन चौकातून बाजीराव रोडने अप्पा बळवंत चौक, बुधवार चौक, शिवाजी रोडने बेलबाग चौक या ठिकाणी येता येईल.

**टिळक रोडवरील विसर्जन मिरवणुक :-**

- टिळक रोडवरील गणेश विसर्जन मिरवणुक दिनांक ०५/०९/२०१७ रोजी दुपारी १२.०० वा. जेधे चौक मार्गे टिळक रोडने सुरु होईल. सदर रोडेन सुमारे २०० मंडळे सहभागी होतात.
- टिळक रोडवरील विसर्जन मिरवणुक टिळक चौकामध्ये (अलका टॉकीज चौक) आल्यानंतर डावीकडे वळुन गांजवे चौक व तेथुन उजवीकडे वळुन पत्रकार भवन मार्गे एस.एम.जोशी पुलाजवळील विसर्जन घाटावर विसर्जित होईल.

- टिळक रोडवरील मिरवणुकीत सामील झालेल्या गणेश मंडळांना टिळक चौकातुन लकडी पुलाकडे जाता येणार नाही. त्यांनी एस.एम.जोशी पुलाजवळील विसर्जन घाटाकडेच जावे लागेल.
- टिळक रोडवर पुरम चौक, एस.पी.कॉलेज चौक, भारती विद्यापीठ भवन व गांजवे चौक या चौकात जास्तित-जास्त १० मिनीटे थांबुन वादन करता येईल. उर्वरित मिरवणुक मार्गावर गणेश मंडळांनी एकाजागी न थांबता सतत पुढे जात रहावे.

**केळकर रोडवरील विसर्जन मिरवणुक :-**

- केळकर रोडवरील मिरवणुक अप्पा बळवंत चौकातुन सुरु होईल व ती केसरी वाडा - टकले हवेली चौक मार्गाने भिडे पुलावर किंवा लकडी पुलावर पांचाळेश्वर घाट किंवा नटेश्वर घाट येथे जाउ शकेल. सदर मिरवणुकीत सुमारे ७० गणेश मंडळे सहभागी होणार आहेत.
- सदर मिरवणुकीत सामील होणा-या मंडळांनी फडके हौद चौक-लाल महल-देसाई कॉलेज- फुटका बुरुज मार्गे अप्पा बळवंत चौकात जावे. सदरची मिरवणुक दिनांक ५/९/२०१७ रोजी १०.३० वा. नंतर सुरु होईल.

**कुमठेकर रोडवरील विसर्जन मिरवणुक :-**

- सदर मिरवणुक दिनांक ०५/९/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. नंतर शनिपार चौकातुन सुरु होईल ती कुमठेकर रस्त्याने टिळक चौकातुन लकडी पुलावरुन पांचाळेश्वर घाट किंवा नटेश्वर घाट येथे जातील. सदर मिरवणुकीमध्ये सुमारे ५० गणेश मंडळे सहभागी होणार आहेत.
- जो पर्यंत मानाचे पहिले पाच गणपती टिळक चौकात येत नाही तोपर्यंत कुमठेकर व केळकर रोडवरील गणपती मंडळांना टिळक चौकात थांबविण्यात येईल. ज्यावेळी मानाचे पहिले ५ गणपती टिळक चौकात येतील त्यावेळेस कुमठेकर व केळकर रस्त्यावरुन येणा-या मंडळांना टिळक चौकात थांबवण्यात येईल व मानाचे पहिले ५ गणपती टिळक चौकातुन लकडी पुल मार्गे पुढे गेल्यानंतर सदर मंडळांना पुढे जाता येईल.

# मंडळांना सर्वसाधारण सुचना

१. मंडळांना ज्या मिरवणुक मार्गावर विसर्जन मिरवणुकीसाठी परवाना देण्यात आला आहे त्याच मार्गावर मंडळांनी मिरवणुक काढावी. अन्य मार्गावर मिरवणुक काढु नये.
२. चारही मिरवणुक मार्गावर ध्वनी प्रदुषणाची पातळी मोजण्यासाठी महत्वाच्या चौकात व्यवस्था करण्यात आली आहे.
३. मंडळांनी त्यांना घालून दिलेल्या अटी व नियमांचे कसोशीने पालन करावे व पोलीसांना सहकार्य करावे.
४. वरील सर्व मिरवणुक मार्गावर महत्वाच्या चौकात व विसर्जनाचे घाटावर सीसीटिव्ही कॅरे बसविण्यात आले आहेत व त्यांच्या सहाय्याने वरिष्ठ पोलीस अधिकारी मिरवणुकीवर लक्ष ठेवार आहेत.
५. सर्व मिरवणुक मार्गावर साध्या वेशातील पोलीस मोठ्या संख्येने तैनात करण्यात आले असुन ते संशयीत वाहन, संशयीत व्यक्ति, संशयीत हालचाली यांचेवर लक्ष ठेवतील.

६. जी मंडळे पोलीसांच्या सुचनांकडे दुर्लक्ष करतील किंवा बेकायदेशीर व बेशिस्त वर्तन करतील किंवा ज्या मंडळांची ध्वनी प्रदुषणाची पातळी मर्यादेपेक्षा अधिक आहे, त्यांच्या नोंदी घेण्यासाठी साध्या वेशातील पोलीसांची नेमणुक करण्यात आली आहे.
७. सर्व गणेश मंडळांना अवाहन करण्यात येते की, त्यांन ठरवून दिलेल्या मार्गानेच त्यांनी मिरवणुकीत सामील व्हावे. मिरवणुक मार्गावरील बॅरिकेड्स तोडून मिरवणुकीमध्ये बेकायदा घुसण्याचा प्रयत्न करु नये.
८. सर्व भाविकांना, नागरीकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी मिरवणुक मार्गावर आजु-बाजुच्या रस्त्यावर व आपल्या सभोवतालच्या परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवावे. कोणतीही संशयीत वस्तु, संशयीत वाहन किंवा संशयीत व्यक्ति अढळल्यास त्याबद्दल जवळच्या पोलीसांना त्वरीत कळवावे किंवा पोलीस नियंत्रण कक्षाला पुढील क्रमांकाला माहिती द्यावी. १००,२६१२२८८०,२६१२३२५०, २६१२६२९६
९. मिरणुकीमध्ये खालील गोष्टींचा समावेश / वापर करण्यास मनाई करण्यात आलेली आहे. टोलचा वापर करणे, लाऊड स्पिकरच्या भिंती उभारणे, फटाके वाजविणे व शोभेची दारुकाम करणे, गुलालाचा मोठ्या प्रमाणात वापर, आगीचे खेळ करणे.
१०. मिरवणुक मार्गावर गणेश मंडळांसाठी व नागरीकांसाठी वैद्यकीय पथक व रुग्णवाहिकेची १) बेलबाग चौक २) अप्पा बळवंत चौक ३) पुरम चौक ४) संभाजी चौक येथे सोय करण्यात आली आहे. तसेच १) गोखले हॉल २) एसपी कॉलेज चौक ३) फडतरे चौक ४) नारायण पेठ पोलीस चौकी या ठिकाणी तात्पुरती वैद्यकीय मदत केंद्रे उभारण्यात आली आहेत. फरासखाना पोलीस स्टेशन आवारात तात्पुरत्या मिनी हॉस्पीटलची सोय करण्यात आली आहे.
११. मिरवणुक मार्गावर कोठेही नागरीकांना तातडीने वैद्यकीय मदतीची गरज असल्यास व मिरवणुक मार्ग बंद असल्यामुळे नागरीकांना अडचण येत असल्यास त्यांनी जवळच्या पोलीसांकडे मदतीची मगणी करावी. त्यांना तातडीने वैद्यकीय मदत हवी असल्यास जवळच्या पोलीस वाहनातुन त्यांना जवळच्या दवाखान्यात जाण्याची सोय करण्यात येईल.
१२. बेलबाग चौक, उंब-य गणपती चौक व अलका टॉकीज चौक या ठिकाणी मध्यवर्ती उद्घोषणेची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
१३. फरासखाना चौक व अलका टॉकीज चौक या ठिकाणी फायरब्रिगेड वाहने व कर्मचारी यांची व्यवस्था करण्यात आली आहे.
१४. सर्व वृत्त वाहिन्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी फक्त लक्ष्मी रोडवरील थेट प्रक्षेपण न करता टिळक रोड, केळकर रोड व कुमठेकर रोड या मार्गावरील मिरवणुकीचे देखील थेट प्रक्षेपण करावे.

**सही/-**

**( डॉ. बसवराज तेली )**

**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, पुणे**